पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

प्रेस नोट दि. : १७/१२/२०२४

## मालेगाव मधील परप्रांतीय इसमाची लुट करणाऱ्या सराईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक

---

दि.०४/१२/२०२४ रोजी मालेगाव येथील नवीन बस स्थानक येथे कोणीतरी अज्ञात ०४ चोरटयांनी दोन मोटार सायकलवर येवुन फिर्यादी मोहम्मद इल्ताफ अन्सारी रा.सिसई, ता. सिसई, जि. गुमला, राज्य - झारखंड यांचा विश्वास संपादन करून फिर्यादीस रूम पाहुन देतो असे सांगितले व फिर्यादीस त्यांचे मोटार सायकलींवर बसवुन एम.आय.डी.सी परिसरात सायाणेबुाा शिवारात घेवुन गेले व अंधारात फिर्यादीस तुम्ही ड्रग्ज विकता असे सांगुन फिर्यादीचे खिशातील ३८,०००/-रू रोख व मोबाईल फोन व दोन चार्जर व उपयुक्त सामान असलेली बॅग व मोबाईल फोन मधुन ट्रान्सफर करून घेतलेले २२,०००/- असा एकुण ६५,३००/-रू. किंमतीचे रोख रक्कमेसह, मोबाईल, चार्जर व कपडे असलेली बॅग असे फिर्यादीच्या ताब्यातुन बळजबरीने हिसकावुन घेवुन दोन मोटार सायकलवर पळुन गेले होते. सदर बाबत मालेगाव तालुका पोलीस स्टेशन गुरनं ७२२/२०२४, भा.न्या.सं. कलम ३०९(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.विक्रम देशमाने व अपर पोलीस अधीक्षक, मालेगाव श्री. अनिकेत भारती, मालेगाव ग्रामिण उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितिन गणापुरे यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्हयातील मालाविरूध्दचे नाउघड गुन्हयांचा समांतर तपास करीत आहे. त्यानुसार स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांनी वरील गुन्हयाचे समांतर तपासात आरोपींचे गुन्हा करण्याचे पध्दतीवरून गोपनीय माहिती घेतली असता, यातील आरोपी हे मालेगाव शहरात असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्यावरून स्थागुशाचे पथकाने मालेगाव शहरातील इस्लामियॉ कॉलनी परिसरात सापळा रचुन सराईत गुन्हेगार नामे **अदनान खान मेहबुब खान वय १९ वर्ष रा. घर नं. १९, इस्लामियॉ कॉलनी, मदनीनगर, मालेगाव व संशयित एक विधीसंघर्षित बालक** यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

सदर आरोपी **अदनान खान मेहबुब खान** यास मालेगाव तालुका पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयात अटक करण्यात आली असुन आरोपीचे कब्जातुन वरील गुन्हयात चोरीस गेलेला ३०,०००/-रू किंमतीचे तीन **मोबाईल, ५०००/- रू. रोख रक्कम व त्यांनी गुन्हा करतांना वापरलेली ५०,०००/-रू किंमतीची मोटर सायकल असा एकुण ८५,०००/-रूपयांचा मुददेमाल** हस्तगत करण्यात आलेला आहे. यातील आरोपी अदनान खान मेहबुब खान हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे, त्याबाबत पुढील तपास स्था.गु.शा कडील पथक करीत आहे. त्याचेविरूध्द यापुर्वी पवारवाडी पो.स्टे. गुरनं १०३/२०२४ भादवि कलम ३९४,५०४,३४, भारतीय हत्यार का. क. ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक, मालेगाव श्री. अनिकेत भारती, मालेगाव ग्रामिण उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितिन गणापुरे यांनी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, पोउपनिरी श्री. दत्ता कांभिरे, पोलीस अंमलदार पोहवा/गिरीश निकुंभ, शरद मोगल, पोना/सुभाष चोपडा,नरेंद्र कोळी, योगेश कोळी तसेच तांत्रिक विश्लेषण शाखचे हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने वरील गुन्हा उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.